मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण, वृक्षसंवर्धनाचा संकल्प

## ग्रीन आणि सस्टेनेबल' पिंपरी-चिंचवडसाठी लोकचळवळ उभारणार - आमदार शंकर जगताप

**पिंपरी | प्रतिनिधी**

औद्योगिक शहर म्हणून ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवडचा चेहरामोहरा बदलताना आता हे शहर 'ग्रीन आणि सस्टेनेबल सिटी' करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. विकास आणि पर्यावरण यांचा समतोल साधत, येणाऱ्या पिढीसाठी 'शुद्ध हवा आणि प्रदूषणमुक्त भविष्य' देण्यासाठी प्रत्येक नागरिकाने यात योगदान द्यावे. केवळ वृक्षारोपण न करता, त्या झाडांचे संवर्धन करत या मोहिमेला आता 'लोकचळवळ' बनवा," असे आवाहन चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी केले.



जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून, पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या 'एक पेड माँ के नाम' आवाहनानुसार बारा घोलप महाविद्यालय परिसर आणि सांगवी जिल्हा रुग्णालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. त्यानिमित्त आमदार जगताप बोलत होते. यावेळी सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, माजी महापौर माई ढोरे, नगरसेवक नवनाथ जगताप, हर्षल ढोरे, ज्ञानेश्वर उर्फ माऊली जगताप, नगरसेविका पल्लवी जगताप, तृप्ती कांबळे, रवीना आंगोळकर, तसेच दुर्गाकौर आदियाल, महामंत्री मधुकर बच्चे, मंडल अध्यक्ष गणेश ढोरे यांच्यासह पक्षाचे विविध मंडल अध्यक्ष, बूथ प्रमुख, पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. या निमिताने वृक्षसंवर्धन, जतन आणि पर्यावरण रक्षणाची शपथ घेण्यात आली.

आमदार शंकर जगताप पुढे म्हणाले की, "झाड लावणे ही केवळ एक औपचारिकता नसून, ती भविष्यासाठी केलेली सामाजिक गुंतवणूक आहे. ही मोहीम आता शहरातील प्रत्येक गृहनिर्माण सोसायटी आणि घराघरापर्यंत पोहोचवण्याचा आमचा संकल्प आहे. नागरिकांनी दत्तक घेतलेले एक झाड, हीच या मोहिमेची खरी यशस्विता असेल." आधुनिक तंत्रज्ञान आणि निसर्ग यांचा मेळ घालत पिंपरी-चिंचवडला स्मार्ट आणि शाश्वत शहर म्हणून विकसित करण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.

### देशी वृक्षांच्या लागवडीवर भर

» आज वृक्षारोपण मोहिमेत शोभेच्या झाडांऐवजी बकुळ, कडुलिंब, कदंब, ताम्हण, बहावा आणि महोगणी अशा बहुउद्देशीय आणि औषधी गुणधर्म असलेल्या देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. हे वृक्ष केवळ सावली देणारे नसून, स्थानिक पक्षी आणि कीटकांच्या जैवविविधतेसाठी पोषक आहेत. तसेच, महाराष्ट्राचे राज्यपुष्प असलेल्या 'ताम्हण'ची लागवड करून सांस्कृतिक वारशाचेही जतन करण्यात आले.

> "पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या संकल्पनेतील 'शाश्वत विकास' आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसजी यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी-चिंचवडचा चेहरामोहरा बदलण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. शहराचा औद्योगिक विकास साधताना पर्यावरणाचा समतोल राखणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड दत्तक घेऊन वृक्षारोपण मोहिमेचे एका मोठ्या लोकचळवळीत रूपांतर करावे. केंद्र आणि राज्य सरकारच्या धोरणांना गती देत, निसर्गाच्या सोबतीने पिंपरी-चिंचवडला एक 'ग्रीन आणि सस्टेनेबल सिटी' बनवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."
>
> - शंकर जगताप, आमदार,
> चिंचवड विधानसभा मतदारसंघ.

# सौर ऊर्जा, वेस्ट टू एनर्जी असतानाही वीज वापरात वाढ

## महापालिका वीजबिलाचा आकड्याचा आलेख चढताच, महापालिकेला वर्षाला 70 मेगावॅट विजेची आवश्यकता

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका कचऱ्यापासून वीज तयार करते. अनेक ठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्प उभारले आहेत. असे असतानाही महावितरण कंपनीच्या विजेचा वापर कमी न होता तो वाढतच असल्याने वीजबिलांच्या आकड्यावरून स्पष्ट होत आहे.




महापालिकेला दरवर्षी 70 मेगावॅट वीज लागत असून, गेल्या वर्षी तब्बल 158 कोटी रुपये खर्च झाले आहेत. बिलाच्या वाढत्या आकडेवारीवरून वीजनिर्मिती प्रकल्प (वेस्ट टू एनर्जी) व सौर ऊर्जा प्रकल्पामुळे महापालिकेच्या खर्चाला लगाम बसत नसल्याचे उघड झाले आहे.

शहराची लोकसंख्या वेगात वाढत असतानाच नागरिकांना मूलभूत सुविधा पुरविणे हे महापालिकेचे कर्तव्य आहे. नागरिकांच्या सुविधांसाठी शहरात महापालिका भवन, 8 क्षेत्रीय कार्यालये, 8 मोठी रुग्णालये, दवाखाने, आरोग्य सेवा केंद्रे, लसीकरण केंद्र, नाट्यगृह, शाळा अशा एकूण 264 इमारती आहेत.

तसेच, जलशुध्दीकरण केंद्र, अशुद्ध जलउपसा केंद्र, मैलासांडपाणी शुद्धीकरण केंद्र (एसटीपी), सीसीटीव्ही कॅमेरे यंत्रणा, रस्त्यावर विद्युत खांब आहेत. त्यासाठी मोठ्या प्रमाणात वीज लागते. महापालिकेला वर्षाला तब्बल 70 मेगावॅट विजेची आवश्यकता भासते. महापालिकेचे नाट्यगृहे, उद्यान अशा ठिकाणी महावितरण कंपनीने विजेचे व्यावसायिक दर लावले आहेत. गेल्यावर्षी 1 एप्रिल 2025 ते 31 मार्च 2026 या वर्षभरात तब्बल 158 कोटी 22 लाख 37 हजार 675 रुपये वीजबिलापोटी महावितरण कंपनीला देण्यात आले आहेत.

महापालिकेच्या रावेत येथील अशुद्ध जलउपसा केंद्रात सर्वाधिक वीज वापरली जाते. पवना नदीतील बंधाऱ्यातून पाणी उचलून ते निगडी, प्राधिकरणातील सेक्टर क्रमांक 23 येथील जलशुद्धीकरण केंद्राकडे पाठवले जाते. पाणी पंपिंग करण्यासाठी प्रत्येक महिन्यास तब्बल 47 लाख 87 हजार युनिट वीज खर्ची पडते. त्यानंतर जलशुद्धीकरण केंद्र, मैलासांडपाणी शुद्धीकरण केंद्र तसेच, महापालिका भवनात सर्वाधिक वीज वापरली जाते.

# मोदी सरकारच्या 12 वर्षपूर्तीनिमित्त पिंपरी-चिंचवडमध्ये वृक्षारोपण अभियान

## भाजपातर्फे मंडलनिहाय पर्यावरण संवर्धनाचा संदेश, आमदार महेश लांडगे यांचे पिंपरी-चिंचवडकरांना आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या १२ वर्षांच्या यशस्वी वाटचालीनिमित्त आणि जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पिंपरी-चिंचवड शहरात विविध ठिकाणी वृक्षारोपण उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात आला. या निमित्ताने पिंपरी-चिंचवडमध्ये पर्यावरण दिनी वसुंधरा संवर्धनाचा संदेश दिला आहे.



भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्त्वाखाली "मोदी सरकारची १२ वर्षे – विश्वास, विकास व जनकल्याण" या अभियानांतर्गत शहरातील विविध मंडलांमध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले. इंद्रायणीनगर-नेहरूनगर मंडल, मोशी-चऱ्होली मंडल, दिघी-गवळीनगर-गव्हाणेवस्ती मंडल तसेच चिखली-कृष्णानगर मंडल येथे कार्यकर्त्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. यावेळी महापौर रवि लांडगे, माजी महापौर नितीन काळजे, सरचिटणीस विकास डोळस, मंडलाध्यक्ष प्रमोद परदेशी, शिवराज लांडगे, अजय साने, अजित बुर्डे, नगरसेवक व आजी-माजी पदाधिकारी उपस्थित होते.

या उपक्रमादरम्यान पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत प्रत्येक बूथ स्तरावर वृक्षलागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी कार्यकर्त्यांना आवाहन करण्यात आले. यावेळी स्थानिक पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भाजपाचे वरिष्ठ उपाध्यक्ष संजय पटनी म्हणाले की, माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी "राष्ट्र प्रथम" या संकल्पनेसोबत सातत्याने सेवा देत आहेत. त्यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली महायुती सरकारच्या ऐतिहासिक कामगिरीची १२ वर्षे दि. ७ जून २०२६ रोजी पूर्ण होत आहेत. मोदीजींच्या नेतृत्वाखालील सरकार देशातील गरीब, शोषित आणि वंचित घटकांच्या कल्याणासाठी उल्लेखनीय कार्य करीत आहेत. तसेच "विकसित भारत" या संकल्पनेच्या पूर्ततेसाठी वेगाने पुढे जात आहेत. आपले राष्ट्रीय अध्यक्ष मा. नितीन नबीन जी यांच्या नेतृत्वात तसेच मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस, यांच्या मार्गदर्शनात महाराष्ट्रात "मोदी सरकारची १२ वर्षे विश्वास, विकास, जनकल्याण" अभियानातंर्गत ५ जून, २०२६ ते २१ जून २०२६ या काळात विविध कार्यक्रमांची योजना ठरली आहे.

"पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज असून वृक्षारोपणाच्या माध्यमातून भावी पिढ्यांसाठी हरित वारसा निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या संकल्पनेला साकार करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाचा सहभाग महत्त्वाचा आहे." भाजपाच्या "विश्वास, विकास व जनकल्याण" अभियानांतर्गत आगामी काळात विशेष जनसंपर्क अभियान, जनकल्याण शिबिरे, नैसर्गिक शेती कार्यशाळा तसेच जागतिक योग दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

> "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने गेल्या १२ वर्षांत विकास, सुशासन आणि जनकल्याणाचा नवा अध्याय अनुभवला आहे. 'विकसित भारत' या संकल्पनेच्या पूर्ततेसाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग महत्त्वाचा आहे. पर्यावरण संवर्धन, जनसंपर्क, जनकल्याणकारी योजनांचा लाभ आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम घडविणारे हे अभियान समाजाला सकारात्मक दिशा देणारे ठरेल. पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांच्या सहकार्याने आपण अधिक हरित, समृद्ध आणि सक्षम शहर उभारण्याचा संकल्प केला आहे."
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**









# 'संडे ऑन सायकल'निमित्त रविवारी वाहतुकीत महत्त्वाचे बदल

## भारतीय खेल प्राधिकरणाच्या वतीने पिंपरी-चिंचवड शहरात रविवार (7 जून) रोजी 'संडे ऑन सायकल' उपक्रमाचे आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारतीय खेल प्राधिकरणाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'संडे ऑन सायकल' या उपक्रमानिमित्त रविवार (७ जून) रोजी पिंपरी-चिंचवड शहरातील विविध प्रमुख मार्गांवर वाहतुकीत तात्पुरते बदल करण्यात आले आहेत. राजीव गांधी ब्रिज ते जगताप डेअरी चौक, काळेवाडी फाटा, पुनावळे, औंध-रावेत बीआरटी मार्ग, मुकाई चौक आणि अंकुश चौक या परिसरातून सायकल स्पर्धा पार पडणार असल्याने काही रस्ते वाहतुकीसाठी बंद राहणार आहेत.




वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विक्रांत देशमुख यांनी याबाबत आदेश जारी केले असून नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन केले आहे. ढोरे पाटील अंडरपास ते डी-मार्ट मार्ग, ब्रेमेन चौक ते ढोरे पाटील अंडरपास मार्ग तसेच शिवार चौक ते काळेवाडी चौक दरम्यानची वाहतूक बंद राहणार आहे.

याशिवाय काळाखडक, डांगे चौक, बिर्ला हॉस्पिटल, मुकाई चौक आणि किवळे परिसरातील काही मार्गांवरही वाहतूक वळविण्यात येणार आहे. संबंधित वाहनचालकांना पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

७ जून रोजी पहाटे ५.३० ते सकाळी १०.३० वाजेपर्यंत हे वाहतूक बदल लागू राहणार असून, नागरिकांनी नियोजन करून प्रवास करण्याचे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे. सायकलिंग संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# महापालिकेला मोठा दिलासा, आचारसंहिता शिथिल होणार

## पुणे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक बिनविरोध झाल्याने आचारसंहिता शिथिल होणार; तातडीच्या विकासकामांवरील निर्बंध हटणार.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषदेची निवडणूक बिनविरोध झाल्याने महापालिकेला चांगलाच दिलासा मिळाला आहे. या निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे शहरातील पाणीकपातीसह, पालखी सोहळ्याची तसेच पावसाळ्यातील तातडीच्या कामांसाठीच्या निविदा या निवडणुकीच्या आचारसंहितेच्या कचाट्यात अडकल्या होत्या. त्यामुळे, पालिकेस धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी जून महिन्याच्या अखेरपर्यंत वाट पाहावी लागली असती.

मात्र, आता पुढील एक-दोन दिवसांतच ही आचारसंहिता शिथिल होणार असल्याने पालिका प्रशासन तसेच पालिकेच्या पदाधिकाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून, महापालिकेतील बैठका पुन्हा नियमित सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आचारसंहितेच्या काळात तातडीच्या कामांसाठी बैठका घेण्यास जिल्हा प्रशासनाने मान्यता दिली होती. मात्र, कोणताही निर्णय घेण्यास मज्जाव केला होता.

शहरात जुलै महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात पालखी सोहळा येत आहे. त्यासाठी तातडीच्या कामांच्या निविदा आचारसंहितेच्या प्रक्रियेत अडकल्या आहेत. याशिवाय, खडकवासला धरणातील पाणीसाठ्याने तळ गाठल्याने शहरात दिवसाआड पाणी देण्याचे प्रशासनाचे नियोजन असून, त्याबाबतचा धोरणात्मक निर्णय प्रशासनाला घ्यावा लागणार होता. मात्र, आचारसंहिता शिथिल झाल्याने पालिकेतील सत्ताधारी भाजपसह सर्व पक्षांच्या प्रमुखांची तातडीची बैठक घेऊन हा निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे.

याशिवाय, पावसाळापूर्व कामांचे अनेक प्रस्तावही रखडलेले असून, त्यांच्या मान्यतांचा मार्गही मोकळा झाला आहे. त्यामुळे पुढील आठवड्यात सोमवार (दि. ८) नंतर पालिकेचे कामकाज नियमित सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तसेच, पालिकेने घेतलेल्या अभियंत्या भर्तीचा निकालही पुढील काही दिवसांतच जाहीर केला जाण्याची शक्यता आहे.




### पाणीटंचाई आणि पालखी सोहळ्याची तयारी

» खडकवासला धरणातील पाणीसाठा झपाट्याने कमी होत असल्याने शहरात दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा पर्याय प्रशासनाच्या विचाराधीन आहे. यासंदर्भातील धोरणात्मक निर्णयासाठी सर्वपक्षीय बैठक घेण्याची तयारी सुरु आहे. दुसरीकडे जुलैच्या पहिल्या आठवड्यात येणाऱ्या संतांच्या पालखी सोहळ्यासाठी रस्ते दुरुस्ती, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि इतर आवश्यक सुविधांच्या निविदा प्रक्रियेलाही गती मिळणार आहे. त्यामुळे आचारसंहिता हटताच शहरातील अनेक तातडीच्या कामांना वेग मिळण्याची शक्यता आहे.

### आचारसंहितेने अडकलेले निर्णय

» पुणे जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने महापालिकेतील अनेक महत्त्वाचे निर्णय रखडले होते. शहरातील संभाव्य दिवसाआड पाणीपुरवठा, पालखी सोहळ्यासाठी आवश्यक निविदा प्रक्रिया, पावसाळी उपाययोजना आणि विविध विकासकामांचे प्रस्ताव मंजुरीअभावी थांबले होते. बैठका घेण्यास परवानगी असली तरी निर्णय घेण्यावर निर्बंध असल्याने प्रशासनाचे कामकाज मंदावले होते. निवडणूक बिनविरोध झाल्याने आचारसंहिता लवकर शिथिल होणार असून महापालिकेला प्रलंबित विषयांवर तातडीने निर्णय घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

### भरती प्रक्रिया आणि विकासकामांना वेग

» महापालिकेच्या अभियंता भरती प्रक्रियेचा निकालही आचारसंहितेमुळे रखडला होता. आता पुढील काही दिवसांत तो जाहीर होण्याची शक्यता आहे. तसेच पावसाळापूर्वीची नालेसफाई, रस्ते दुरुस्ती, जलनिस्सारण आणि इतर विकासकामांच्या प्रस्तावांना मंजुरी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सोमवार (दि. ८) नंतर महापालिकेचे कामकाज नियमितपणे सुरू होण्याची अपेक्षा असून प्रशासन आणि लोकप्रतिनिधींना प्रलंबित प्रश्नांवर निर्णय घेण्यासाठी मोठा दिलासा मिळाला आहे.

# तर पाणी ऑगस्टपर्यंत पुरले असते...पाटबंधारे विभागाचा पुणे महापालिकेवर निशाणा

## हवामान खात्याच्या कमी पावसाच्या अंदाजानंतर जलसंपदा विभागाने दिली होती कपातीची सूचना; पालिकेने दुर्लक्ष केल्याचा दावा.

**पुणे | प्रतिनिधी**

खडकवासला प्रकल्पातील पाणी ३१ जुलैपर्यंत पुरेल अशा पद्धतीने पाणीसाठ्याचे नियोजन दरवर्षी केले जाते. यंदा हवामान खात्याने पावसाचे प्रमाण कमी असल्याची शक्यता वर्तविली आहे. यामुळे पाणी पुरवठ्यात १५ टक्क्यांनी कपात करावी, असे पत्र जलसंपदा विभागाने महापालिकेला दिले होते. पत्रानुसार कपात केली असती तर पाणी ऑगस्टपर्यंत पुरले असते, अशी माहिती जलसंपदा विभागाने दिली.

हवामान खात्याने एल-निनो व आयओडी प्रभावाबाबत वर्तविलेल्या अंदाजावर मार्चमध्ये अधिवेशानत चर्चा झाली होती. मान्सूनचे प्रमाण कमी असल्याचे नमूद केल्याने उपलब्ध पाणीसाठ्याचा काटेकोर वापर करा अशा सूचना जलसंपदा मंत्र्यांनी दिल्या. धरणातील उपलब्ध पाणीसाठा आणि भविष्यात अवर्षणप्रवण परिस्थिती निर्माण झाल्यास पिण्याच्या पाण्याचे नियोजन करणे क्रमप्राप्त आहे.

यामुळे ३१ ऑगस्ट पर्यंत पिण्याचे पाणी देता येईल आणि पाणी टंचाईचा सामना करावा लागणार नाही. त्यासाठी दरमहाच्या णी पुरवठ्यात पंधरा टक्के पाणी कपात करावी आणि त्यासाठी पालिकेने आपल्या स्तरावर योग्य ते नियोजन करावे असेही पालिकेला पाठविलेल्या पत्रात जलसंपदा विभागाने म्हटले होते. पालिकेतील सत्ताधारी पक्षाने पाणी कपात करणार नसल्याचे सांगत जलसंपदा विभागाच्या मागणीकडे दुर्लक्ष केले.

यानंतर जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पावसाची स्थिती गंभीर असल्यास धरणांमधील पाणीसाठा ३१ ऑगस्टपर्यंत पुरेल, असे नियोजन करावे, हे नियोजन केले महापालिकेने केले नाही तर त्याचा फटका पुणेकरांना बसणार आहे. त्यामुळे पाणीकपात करावी की नाही हे पालिकेनेच ठरवावे,' असे स्पष्ट केले होते. त्यावरही पालिकेने कोणताही निर्णय घेतला नव्हता.

पुणे शहराला खडकवासला धरणसाखळी प्रकल्पासून पाणी पुरवठा केला जातो. या चारही धरणात मिळून सध्या ५.७२ टीएमसी म्हणजे १९.६३ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. शहराला दरमहा सव्वा ते दीड टीएमसी पाणी लागते. त्यामध्ये पंधरा टक्के कपात केल्यानंतर सुमारे अडीचशे ते तीनशे एमएलडी पाण्याची कपात करावी लागणार होती.



### धरणातील पाण्याची स्थिती

धरणाचे नाव – उपलब्ध पाणीसाठा – टक्केवारी
» खडकवासला – ०.९९ टीएमसी – ४९.९७ टक्के
» पानशेत – २.५४ टीएमसी – २३.८१ टक्के
» वरसगाव – २.२१ टीएमसी – १७.२७ टक्के
» टेमघर- ० टीएमसी -० टक्के

# विधान परिषदेत 'अजितदादा' गटाचा धमाका; राजकीय नाट्यानंतर विक्रम काकडे बिनविरोध

## श्रीकांत पाटील, प्रदीप कंद, सुनील टिंगरेंच्या माघारीने काकडेंच्या गळ्यात विजयाची माळ

**पुणे | प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद मतदारसंघातील निवडणुकीतील सर्व राजकीय तर्क-वितर्कांना आणि बंडखोरीच्या नाट्यमय प्रवासाला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. महायुतीमधील तडजोडीचे राजकारण आणि महाविकास आघाडीने घेतलेली माघार यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) उमेदवार विक्रम काकडे यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे.

भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद आणि महाविकास आघाडीचे उमेदवार श्रीकांत पाटील यांच्यासह अन्य अपक्ष उमेदवारांनी ऐनवेळी रिंगणातून माघार घेतल्याने काकडे यांच्या विजयाचा मार्ग सुकर झाला. त्यांच्या विजयाची अधिकृत घोषणा 22 जून रोजी करण्यात येणार आहे.

पुणे विधान परिषद मतदारसंघावर आपला दावा सांगत राष्ट्रवादी काँग्रेसने बांधकाम व्यावसायिक संजय काकडे यांचा मुलगा विक्रम काकडेला उमेदवारी दिली. त्यांच्या उमेदवारीवरून पक्षात वाद उफाळून आला होता. मात्र, अंतर्गत वाद शमवण्यात पक्षनेत्यांना यश आले. गुरुवारी (दि. 4 जून) उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटच्या दिवशी अनेक नाट्यमय घडामोडी पाहायला मिळाल्या. महायुतीच्या जागावाटपात हा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) वाट्याला गेला होता. मात्र, भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद यांनी बंडखोरी करत अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केल्याने महायुतीत अस्वस्थता आणि संभ्रम निर्माण झाला होता.

दरम्यान, प्रदीप कंद यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. यामुळे ते अर्ज माघारी घेतील अशी चर्चा होती. मात्र, अर्जमाघारीच्या दिवशी त्यांचा फोन नॉट रिचेबल होता. अर्ज माघारी घेण्यास काही अवधी राहिला होता.

यामुळे राष्ट्रवादीच्या गोटात चिंतेचे वातावरण होते. शेवटच्या दिवशी महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांनी चक्रव्यूह फिरवत मध्यस्थी केली. अखेर शेवटच्या क्षणी आमदार राहुल कुल यांच्यासोबत प्रदीप कंद हे जिल्हाधिकारी कार्यालयात आले. त्यांनी 'महायुतीचा धर्म' पाळत पक्षाच्या आदेशाचा मान राखला आणि आपली उमेदवारी मागे घेतली.

ही निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या दिग्गजांनी प्रयत्न सुरू केले. उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्ष सुनेत्रा पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांशी ही निवडणूक बिनविरोध करण्याबाबत विनंती केली होती.



### बिनविरोध निवडीची घोषणा

» प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी गजानन पाटील यांनी या सर्व माघारींची अधिकृत घोषणा केली. प्रदीप कंद, श्रीकांत पाटील, सुनील टिंगरे यांच्यासह तुषार कामठे आणि सुनील जरे या पाच उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने अखेर विक्रम काकडे हेच एकमेव वैध उमेदवार रिंगणात उरल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यांच्या निवडीची अधिकृत घोषणा 22 जून रोजी करण्यात येणार आहे

### श्रीकांत पाटील यांची माघार

» दुसरीकडे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाने देखील ही निवडणूक लढवण्याचे ठरवत श्रीकांत पाटील यांना उमेदवारी दिली. पाटील यांच्या उमेदवारीमुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे टेन्शन वाढवले होते. त्यामुळे या निवडणुकीत काकडे विरुद्ध पाटील अशी लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले होते. अर्ज मागे घेण्याचा शेवटच्या दिवशी बंडखोर प्रदीप कंद यांनी उमेदवारी मागे घेतली. त्यामुळे काकडे यांच्यासमोर पाटील यांचे आव्हान होते.

### दोन 'एबी' फॉर्मचा पेच सुटला

» निवडणुकीच्या शेवटच्या दिवशी केवळ विरोधकांशीच नव्हे, तर पक्षांतर्गत पेचाशीही राष्ट्रवादीला लढावे लागले होते. विक्रम काकडे यांच्यासोबतच माजी आमदार सुनील टिंगरे यांनीही अधिकृत 'एबी फॉर्म'सह अर्ज दाखल केल्याने पक्षाचा खरा उमेदवार कोण? याबाबत मोठा सस्पेन्स तयार झाला होता. अखेर पक्षनेत्यांनी आदेश दिल्यावर सुनील टिंगरे यांनी माघार घेतली. यामुळे विक्रम काकडे यांच्या निवडीचा मार्ग मोकळा झाला.

# गर्भलिंग निदान करणाऱ्यांवर आता थेट 'मोक्का'? डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या बैठकीत मोठा निर्णय

## वारंवार अवैध गर्भलिंग निदान करणाऱ्यांवर संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायद्यांतर्गत कारवाई करण्याबाबत बैठकीत एकमत.

**पुणे | प्रतिनिधी**

गर्भलिंग निदानाच्या वाढत्या घटनांना आळा घालण्यासाठी केवळ गुन्हे दाखल करून चालणार नाही, तर न्यायालयीन प्रक्रियेत दोषसिद्धीचे (शिक्षा होण्याचे) प्रमाण वाढविणे आवश्यक आहे, असे मत शिवसेना नेत्या व आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांनी गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्याच्या (पीसीपीएनडीटी) अंमलबजावणीबाबत बोलावलेल्या बैठकीत मांडले.

तसेच, कायद्याच्या कडक अंमलबजावणीसाठी अनेक महत्त्वपूर्ण सूचना त्यांनी मांडल्या. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागनाथ एम्पल्ले, वैद्यकीय अधिकारी डॉ. वैशाली बडदे, सार्वजनिक आरोग्य विभागाचे संचालक डॉ. विजय कंदेवाढ, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाचे अतिरिक्त संचालक डॉ. संदीप सांगळे, पोलीस उपअधीक्षक बापूराव धडस, पोलीस निरीक्षक नारायण देशमुख आदी उपस्थित होते.

पीसीपीएनडीटी कायद्याच्या कलम २८ नुसार सिव्हील सर्जन यांना कारवाईचे अधिकार असून, ही प्रक्रिया अधिक वेगवान आणि काटेकोर करण्यासाठी स्वतंत्र नियमावली तयार करण्याची गरज असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. दीर्घकाळ चालणाऱ्या खटल्यांमुळे आरोपींना जामीन मिळतो आणि तेच गुन्हेगार पुन्हा संघटित होऊन अवैध धंदे सुरू ठेवतात.

त्यावर कठोर तोडगा म्हणून वारंवार असे गुन्हे करणाऱ्या टोळ्यांवर संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायदा म्हणजेच मोक्का अंतर्गत कारवाई करण्याबाबत बैठकीत एकमत झाले. पुणे जिल्ह्यात घडलेल्या प्रकरणांवर बोलताना पोलीस अधीक्षक संदीप गिल यांनी दूरध्वनीवरून या प्रकरणातील दोषींवर कडक कायदेशीर कारवाई करण्याचे आश्वासन दिले.



### कठोर अंमलबजावणीची गरज

» गर्भलिंग निदानाच्या वाढत्या घटनांना आळा घालण्यासाठी केवळ गुन्हे दाखल करून उपयोग नाही, तर न्यायालयात दोषसिद्धीचे प्रमाण वाढणे अत्यावश्यक असल्याचे आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांनी स्पष्ट केले. पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत कारवाई अधिक प्रभावी करण्यासाठी स्वतंत्र नियमावली तयार करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. दीर्घकाळ प्रलंबित राहणाऱ्या खटल्यांमुळे आरोपींना जामीन मिळून ते पुन्हा अवैध व्यवसाय सुरू करतात. त्यामुळे वारंवार असे गुन्हे करणाऱ्या टोळ्यांवर संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायदा (मोक्का) लागू करण्याबाबत बैठकीत सकारात्मक चर्चा झाली.